**Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143**

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**November 2020 Special Issue- 29 Vol. I**

# Human Rights

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**Shaurya Publication, Latur**

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 29 , Vol. 1 November 2020 | Peer Reviewed SJIF | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 7.139 |
|---|---|---|

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

**SPECIAL ISSUE – 29 Vol I**

**Title of the issue : - Human Rights**

© **All rights reserved with the College & publisher Price : Rs. 400/-**

**Editor – Arun Godam**
**Latur**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Published BY**
Shaurya Publication
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com , 8149668999

**Printed By.**
**Shaurya Offset**
Old MIDC , Near Kirti Gold Chowk, Latur
Email- hitechresearch11@gmail.com

EDITION :
November. 2020

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

54. सामाजीक न्यायसाठी मानवी हक्काचीं आवश्यकता 152
प्रा.धिमधिमे किरणकुमार मोहन

55. मानवी हक्क आणि बालकांची समस्या - एक समाजशास्त्रीय चिंतन 154
प्रा.डॉ. यादव घोडके

56. "स्त्रीविरोधी हिंसाचार आणि मानवी हक्क" 157
डॉ. ज्ञानोबा विठ्ठलराव पडोळे

57. मानवी हक्क : १९४२ च्या चळवळीचे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील योगदान 160
प्रा.राजकुमार ज्ञानोबा चाटे

58. "धार्मिक हिंसाचार, आतंकवाद आणि मानवी हक्क" 163
प्रा. डॉ.घायाळ एस.टी.

59. मानवी हक्क आणि महिला संरक्षण 165
डॉ. विठ्ठल भिमराव मातकर

60. मानवी हक्क आणि दहशतवाद समस्या 168
प्रा. डॉ. चव्हाण सुखदेव गोविंदराव

61. मानव अधिकार आणि सामाजिक न्याय 170
डॉ. फुलचंद सलामपूरे

62. "मानवी अधिकार आणि सामाजिक न्याय" 171
डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर

63. "मानव अधिकार आणि नक्षलवादी चळवळीचा समाजशास्त्रीय अभ्यास" 174
डॉ. तांदळे एस.एस.

64. "मानवी हक्क व संरक्षण " 176
प्रा. डॉ. विजय पोकळे

65. सामाजिक न्याय आणि मानवी अधिकार 178
प्रा. गायकवाड प्रभाकर काशिनाथ

66. भारतातील मानवी हक्काचे उल्लंघन एक अभ्यास 180
प्रा. पोपळघट आर. एस.

67. "मानवी हक्क आणि महिला हिंसाचार" 183
प्रा. आर.बी. काळे

68. मानवी हक्क आणि सामाजिक न्याय 186
प्रा. डॉ. विनोद बी. खेडकर

69. मानवी हक्क व बालकामगार निर्मुलनाचे उपायः समाजशास्त्रीय अभ्यास 189
प्रा. पोकळे एस.एम.

70. भारतातील प्रादेशीक विकासातील असमतोल आणि मानवी अधिकार 192
प्रा.डॉ.विकास चांगदेव शिनगारे

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

# मानवी हक्क आणि सामाजिक न्याय

**प्रा. डॉ. विनोद बी. खेडकर**

सहाय्यक प्राध्यापकए समाजशास्त्र विभागए डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर–२२

**सारांश : -**

२० व्या शतकात सर्वत्र चर्चेचा विषय बनलेली 'मानवी हक्क' संकल्पना दोन महायुद्धाशी व त्यातील अपरिमित जीवितहानीशी संबंधित आहे. युद्धात झालेल्या प्रचंड मानवहानीमुळे विश्वातील तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, कायदेतज्ञ, शिक्षणतज्ञ, यांनी एकत्रित येऊन याचे चिंतन–मनन, आत्मपरीक्षण व चर्चा करण्यास प्रारंभ केला. यातच संयुक्त राष्ट्र संघाने पुढाकार घेऊन 1948 मध्ये 'मानवी हक्काचा सार्वभौमिक जाहीरनामा' प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. पुढे याला सामाजिक न्यायाशी जोडले गेले. कारण सामाजिक हित किंवा सामाजिक कल्याण हाच हक्कांचा मुख्य निकष असतो. व्यक्तीला प्राप्त होणाऱ्या हक्कातून सामाजिक हित किंवा सामाजिक कल्याण साधले गेले पाहिजे. तसेच मानव जातीच्या सर्व घटकांना, व्यक्तींना आपले हक्क समानतेने प्राप्त व्हावेत. मानवी हक्काच्या बाबतीत व्यक्ती व्यक्ती मध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव असू नये, सर्वांना कायद्याद्वारे समान संरक्षण प्राप्त व्हावे, मानवी हक्कांचे उल्लंघन करताना बळी पडणाऱ्या व्यक्तींना सामाजिक न्याय मिळण्याच्या संदर्भात सरकारची कर्तव्य, त्यांची मूलभूत कर्तव्य, सामाजिक, आर्थिक समानता प्रस्थापित करताना सामाजिक न्यायाचा उपयोग कसा होतो, महिला व वंचित घटकांसाठीचे प्रयत्न, आणि तरतुदी इत्यादींचा उहापोह प्रस्तुत 'मानवी हक्क आणि सामाजिक न्याय' या शोधनिबंधामध्ये केला आहे. यासाठी संशोधकांनी तथ्य संकलन पद्धतीतील व्दितीयक साधनांचा उपयोग केला आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन आराखडा याचा उपयोग देखील केला आहे.

➢ **कीवर्ड्स:** - मानवी हक्क, सामाजिक न्याय

➢ **प्रस्तावना: -**

२० व्या शतकाच्या सुरुवातीला मानवी हक्क या शब्दाचा उदय झाला. मानवी हक्कास अनेक राष्ट्रांमध्ये लोकतांत्रिक अधिकार म्हणून ओळखले जाते. 1948 मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने (युनो) मानवी हक्काची घोषणा करून संपूर्ण मानवजातीला एका समानते मध्ये आणून ठेवले. मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 नुसार मानवी हक्क म्हणजे जीवन स्वातंत्र्य, समानता आणि व्यक्तीचा सन्मानाने जगण्याचा अधिकार, हा हक्क भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकांना प्रदान केला आहे. तसेच भारतीय कायद्याने यास संरक्षण प्रदान केले आहे. अभिव्यक्ति स्वातंत्र्य, कायद्याच्या समोर समानता, शिक्षणाचा अधिकार, समान वेतनाचा अधिकार, व्यक्तीच्या आत्मसन्मानाचा अधिकार, कायद्याकडे दाद मागण्याचा अधिकार यासारख्या घटकांचा समावेश घटनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये करण्यात आला.[1] भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय, समता व प्रतिष्ठा कोणत्याही भेदभावाशिवाय प्रदान करते. देशातील कोणत्याही नागरिकांबाबत धर्म, जात, लिंग, वंश, जन्म या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाऊ शकत नाही. मानवी अधिकारांच्या सिद्धांतानुसार अशी अपेक्षा करण्यात येते की सर्व जनतेला किमान चांगले जीवन जगता यावे याकरिता आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती एकसमान आकृतिबंध निश्चित केला जावा. त्या नुसार असा आकृतिबंध निश्चित केला गेला.

➢ **मानवी अधिकार संकल्पना : -**

प्रत्येक व्यक्तीला वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय किंवा इतर विचारसरणी, राष्ट्रीय अथवा सामाजिक उत्पत्तिस्थान, मालमत्ता, जन्म किंवा इतर कोणत्याही दर्जाच्या आधारावर भेदभाव न करता त्याच्या अथवा तिच्या अधिकारांचा उपभोग देण्याचा अधिकार आहे. मानव अधिकार संकल्पनेचा उल्लेख सर्वप्रथम 'हेनरी डेव्हिस थोरो' या विचारवंताने आपल्या 'डीसओबीडीअन्स' या ग्रंथात केला आहे.[2]

➢ **सामाजिक न्यायाची संकल्पना :-**

सामाजिक न्याय ही एक बहुआयामी संकल्पना आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही न्यायाची अविभाज्य अंगे आहेत. समाजातील प्रत्येकाला समान स्वातंत्र्य व समान संधी उपलब्ध करून देणे आणि योग्य संधीच्या अभावी आर्थिक–सामाजिक ऊपेक्षांच्या संकटात असणाऱ्यांना योग्य पातळीवर आणणे यास सामाजिक न्याय म्हणतात. सामाजिक न्यायाचा उद्देश सर्व नागरिकांना हक्क प्रदान करून सामाजिक समानता प्रदान करणे हा आहे. तसेच जात, वंश, धर्म, आर्थिक, लैंगिक भेदभाव नष्ट करून सर्व नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान करून समानता प्रस्थापित करणे हा आहे. सामाजिक न्याय वृद्ध, हीन महिला व वंचित घटकांना राज्याद्वारे संरक्षणाचा अधिकार प्रदान करून समानता प्रस्थापित करतो.

➢ **भारतीय महिलांचे अधिकार आणि सामाजिक न्याय**

भारतीय महिलांचे आत्तापर्यंतचे मागासलेपणाचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना मानवी अधिकारांपासून वंचित ठेवणे हे आहे. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने कामे करून सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळत नव्हते. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कल्पना, सामाजिक रूढी व परंपरामुळे त्यांच्या अधिकारांकडे दुर्लक्ष करण्यात



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

आले. परंतु राजाराम मोहन राय, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या दृष्टीने सर्व भारतीयांचे लक्ष वेधले. एवढेच नव्हे तर त्यांना सामाजिक न्याय मिळवून देऊन सर्व प्रकारचे हक्क प्रदान केले. भारतीय राज्यघटनेने सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने व स्त्रियांना सक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. तसेच स्त्रियांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला आहे. स्त्रीया व दुर्बल घटकांचे संरक्षण करण्यासाठी खास सवलती व कायदे केले आहेत. भारतीय राज्यघटनेत महिलांच्या संबंधी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. आपल्या राज्यघटनेच्या सरनाम्यातच सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देण्यात आली आहे.
भारतीय राज्यघटनेत मूलभूत हक्कांची तरतूद करताना समानतेचे तत्व प्रमाण मानले आहे. तसेच राज्यघटनेत नागरिकांच्या मूलभूत कर्तव्यांचा (भाग–4 अ, कलम 51) समावेश करण्यात आला आहे. या भागातही महिलांना समानतेची वागणूक देण्यासंबंधी उल्लेख आहे.1993 च्या ७३ व्या घटना दुरुस्ती कायद्यान्वये पंचायतराजमध्ये महिलांना राखीव जागांची तरतूद करून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले. तसेच सर्व महत्त्वाची घटनात्मक अधिकारपदे महिलांसाठी खुली करण्यात त्यामुळे राष्ट्रपती, पंतप्रधानपद, सर्वोच्च न्यायालय, मुख्य निर्वाचन आयुक्त, महालेखापरीक्षक इत्यादी घटनात्मक अधिकारपदे प्राप्त करण्याचा हक्क महिलांना प्राप्त झाला.
स्वातंत्र्योत्तर काळात अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा 1956, मातृत्व लाभ कायदा 1961, हुंडाबंदी कायदा 1961, स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंधक) कायदा 1986, राष्ट्रीय महिला आयोग 1990, कौटुंबिक हिंसेपासून स्त्रियांचे संरक्षण कायदा 2005, बालविवाह बंदी कायदा 2006, इत्यादी कायद्याद्वारे महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदूकोड बिल आणून महिलांच्या हक्कासंबंधी महत्त्वाचे पाऊल उचलले. 1990 चा राष्ट्रीय महिला आयोग महिलांच्या सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. तसेच महिलांच्या विकासासाठी त्यांना समान अधिकार प्राप्त होण्यासाठी अनेक विकासात्मक योजनांची अंमलबजावणी करण्यात आली.

➢ **सामाजिक दृष्ट्या वंचित वर्गाचे हक्क आणि न्याय**

भारतीय समाजातील सामाजिकदृष्ट्या वंचित वर्गात किंवा गटात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्यांक इत्यादींचा समावेश होतो. पारंपारिक भारतीय समाजात या वर्गांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवण्यात आले. या वर्गाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या विकासाकरिता अनेक हक्क प्रदान करण्यात आले. अनुसूचित जातींच्या विकासाकरिता घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. घटनेच्या सरनाम्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय न्यायाची हमी देण्यात आली. स्वातंत्र्य, समता व बंधुता याची हमी दिली गेली. घटनेच्या १७ व्या कलमान्वये अस्पृश्यतेचे पालन करणे गुन्हा ठरविण्यात आला. कलम 38 मध्ये लोकांच्या कल्याणासाठी सामाजिक व राजकीय न्याय असेल अशी तरतूद करण्यात आली. कलम ४६ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची काळजी आणि सामाजिक अन्यायाचे संरक्षण करण्यात आले. तसेच लोकसभा, विधानसभा, पंचायतराज मध्ये राखीव जागांची तरतूद करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा सर्वात मोठा प्रयत्न करण्यात आला. अनुसूचित जातींसाठी राष्ट्रीय आयोगाची स्थापना करून अनुसूचित जातींना हक्क प्रदान करण्यात आले. हा आयोग अनुसूचित हातींच्या अधिकारांसाठी व न्यायासाठी सतत अग्रेसर असतो.

भारतामध्ये इतर मागासवर्ग हा एक दुर्बल व वंचित घटक म्हणून ओळखला जातो. या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. सामाजिक न्यायाच्या कायम प्रतीक्षेत असलेला हा घटक कायम दुर्लक्षित राहिला. भारतीय राज्यघटनेत देखील या घटकांना म्हणावे तेवढे स्थान दिले गेले नाही. आजही हा समाज आपल्या न्याय्य हक्कांसाठी विविध पातळीवर लढतांना दिसतो. OBC ना शैक्षणिक, नोकरी व पंचायतराज मध्ये आरक्षण असतांना देखील पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही.म्हणून हा समाज कायम न्यायाच्या पतीक्षेत असतो. राज्य घटनेच्या ३४३ व्या कलमानुसार भारताचे राष्ट्रपती या घटकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आयोग निर्माण करतील. अशी तरतूद करण्यात आली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटनेत OBC च्या विकासासाठी काही तरतुदी केल्या. त्याच दृष्टिकोनातून काकासाहेब कालेलकर आयोग नियुक्त केला. परंतु त्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात निष्क्रियता दाखवली गेली. त्यानंतर 1979 मध्ये मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक शिफारशी केल्या. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने मागासवर्गीयांना शासकीय–निमशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, अनुदानित खाजगी संस्था इत्यादी ठिकाणी २७ टक्के जागा राखीव ठेवण्यात याव्यात, नोकरीसाठीची वयोमर्यादेची अट शिथिल करण्यात यावी, विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा तसेच वसतीगृहे स्थापन करावीत. अशा अनेक शिफारशी करण्यात आल्या. 1990 मध्ये याच मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची घोषणा करून इतर मागासवर्गीयांच्या हक्कांसाठी व सामाजिक न्यायाच्या दृष्टीने प्रयत्न झाला. त्याच दृष्टीने शिष्यवृत्या, मुलामुलींसाठी वस्तीगृहे, राष्ट्रीय मागासवर्ग व विकास मंडळ, शासकीय सेवांमध्ये आरक्षण देण्यात येऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न झाले.

➢ **समारोप**

सामाजिक न्याय ही एक क्रांतिकारक संकल्पना असून व्यक्तीच्या जीवनाला अर्थ आणि महत्त्व प्रदान करते आणि कायद्याचे नियम गतिमान बनविते. जेव्हा भारतीय समाज त्याच्या कायद्याद्वारे आणि कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे

सामाजिक असमानता नष्ट करून सामाजिक अधिकार देण्याचा प्रयत्न झाला. कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये सामाजिक न्यायाला महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय समाज त्याच्या कायद्याद्वारे आणि कायद्याच्या अंमलबजावणीत सामाजिक असमानता नष्ट करून सामाजिक अधिकार देण्याचा प्रयत्न व समतावादी समाजासाठी सामाजिक न्यायाची संकल्पना महत्त्वाची मानली जाते. भारतीय राज्यघटनेने समतावादी समाज निर्मितीसाठी अनेक हक्क प्रदान केले. महिला आरक्षण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांचे संरक्षण, इतर मागासवर्ग आणि अल्पसंख्यांकाचे संरक्षण करून या घटकांसाठी तरतुदी करण्यात आल्या. त्यांना हक्क प्रदान करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. देशाबरोबर राज्यांनीही अनेक योजनांची अंमलबजावणी करून व अधिकार प्रदान करून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला.

**संदर्भग्रंथ :–**

1. शहा, घनश्याम,(2017), भारतीय सामाजिक चळवळी, पुणे: डायमंड पब्लिकेशन.page no. 202.
2. हक्क तुमचे जाणून घ्या, माहिती पुस्तिका, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग, नवी दिल्ली.

**संदर्भ**

1. Pillai, Arun Kumar. (1998). National Human Rights Commission of India, New Delhi: Atlantic Publisher & Distributors.
2. Kazmi, Farid. (1987). Human Rights Myth & Reality, New Delhi: Intellectual Publishing House.
3. https://en.m.wikipedia.org/wiki/On_Liberty

DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022